| पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template | | | | |
|---|---|---|---|---|
| **विभागाचे नाव** | | | **सामान्य प्रशासन विभाग** | |
| **अ. क्र.** | **प्रक्रिया स्थिती** (Steages of Process Mapping) | **बाब** | माहिती | **शेरा** |
| PC१ | प्रक्रिया ओळख व वर्गीकरण (Process Identification and Classification) | प्रक्रियेचे **नाव** | गट क सेवा भरती प्रकिया राबविणे. | |
| PC२ | | कार्यासन **संकेतांक** (उदा. आस्था1, लेखा 4) | आस्थापना २ | |
| PP१ | प्रक्रिया प्रस्तावित करणे (process proposal) | प्रक्रिया प्रस्तावित करणाऱ्या अधिकारी /कर्मचारी (Maker)- **पदनाम** | वरिष्ठ सहाय्यक | |
| PP२ | | संदर्भीय कायदा, नियम मॅन्युअल, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, न्यायालय निकाल, शासन पुस्तके,पत्रे इत्यादी क्रमांकासह शिर्षक नमुद करावेत. | **महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश ) नियम १९६७ मधील परिशिष्ठ नऊ (नियम ५ )**<br>जिल्हा सेवा (वर्ग ३) लिपीक वर्गीय आणि जिल्हा सेवा (दुय्यम लिपीक वर्गीय ) यात अंतभूत असलेल्या पदांवरील नेमणूकीकरिता उमेदवारांसाठी आवश्यक असलेल्या अर्हता आणि नेमणूकीच्या पध्दती नमुद करणारे नियमानुसार कनिष्ठ सहाय्यक (लिपीक ) व वरिष्ठ सहाय्यक (लिपीक ) ही पदे नामनिर्देशनाने भरणेत येतात.<br>**सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.न्याप्र/१००३/९९/प्र.क्र.-२/०३(भगा )/१६-अ दि.२५/१०/२००५ नुसार शासकीय सेवेत गट क व गट ड सेवा भरतीसाठी एकत्रित मागदर्शक तत्वे तयार करुन देणेत आलेली आहेत.** | |
| | | | १.सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.एसआरव्ही /१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ दि.१६/३/१९९९ अन्वये शासन सेवेत सरळ सेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यान्वित करणेत आलेले आहे.<br>२.सेवेतील नियुक्तीसाठी सामाजीक आरक्षण (उभे आरक्षण ) खालीलप्रमाणे आहे.<br>अ.क्र. प्रवर्गाचे नाव टक्केवारी<br>१ अनुसूचित जाती १३ %<br>२ अनुसूचित जमाती ७%<br>३ विमुक्त जाती (अ ) ३%<br>४ भटक्या जमाती (ब ) २.५%<br>५ भटक्या जमाती ( क ) ३.५%<br>६ भटक्या जमाती ( ड ) २ %<br>७ विशेष मागास प्रवर्ग २ %<br>८ इतर मागास प्रवर्ग १९ %<br>एकूण ५२<br>९. खुला ४८%<br>एकुण १०० % | |

प्रक्रिया प्रस्तावित करणे

| | |
|---|---|
| वर नमुद केलेल्या आराक्षणा व्यतिरिक्त सेवा व्यतिरिक्त लागू असलेले आरण समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे<br>१. माजी सैनिक - १५% फक्त गट क आणि ड साठी<br>२. प्रकल्पग्रस्त - ५ % फक्त गट क आणि ड साठी<br>३. भुकंमग्रस्त - २ % फक्त गट क आणि ड साठी<br>४. दिव्यांग - ३ % गट अ आणि गट ब मधील काही पदांसाठी आणि गट क आणि ड साठी<br>५.महिला आरक्षण - ३० %<br>६.खेळाडू - ५%<br>७.अंशकालीन पदवीकाधारक - १०% | |
| १. माजी सैनिक - १५ % समांतर आरक्षण दि.२/९/१९८३ चे शासन निर्णयान्वये लागू करणेत आलेले आहे. | |
| २.महिला आरक्षण - ३०% समांतर आरक्षण दि.१/४/१९९४ चे शासन निर्णयान्वये लागू करणेत आलेले आहे. | |
| ३.खेळाडू - ५% समांतर आरक्षण दि.३०/४/२००५ चे शासन निर्णयान्वये लागू करणेत आलेले आहे. | |
| ४.अशंकालीन पदवीकाधारक - १०% समांतर आरक्षण दि.२७/१०/२००९ चे शासन निर्णयान्वये लागू करणेत आलेले आहे. | |
| ५.प्रकल्पग्रस्त - ५% समांतर आरक्षण दि२७/८/२००९ चे शासन निर्णयान्वये लागू करणेत आलेले आहे. | |
| ६.भुकंमग्रस्त - २% समांतर आरक्षण दि२७/८/२००९ चे शासन निर्णयान्वये लागू करणेत आलेले आहे. | |
| दिव्यांग - सामान्य प्रशासन विभागाकडील दि.२/५/१९९८ चे परिपत्रकान्वये अपंग व्यक्ती (समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे ) सरंक्षण अधिनियम १९९५, नुसार शासन सेवेतील पदांवर अपंगासाठी शाररीकदृष्टया अपंगासाठी आरक्षण ठेवण्याबाबतची कार्यपध्दती निश्चीत करुन देणेत आलेली आहे. | |
| महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही-2004/प्र.क्र.19/2004/12, दि.17 ऑगस्ट 2004 [कमाल वयोमर्यादा] | |
| महाराष्ट्र शासन, वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. अनियो 1005/126/सेवा-4, दि. 31 ऑक्टोबर 2005 [DCPS लागू] | |
| महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र. चापअ-1008/प्र.क्र./57/2008/16-अ, मंत्रालय, मुंबई 32, दि. 30/09/2008 [चारित्र्य पडताळणी] | |
| महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दि. 12 डिसेंबर 2011[ जात वैधता] | |
| 10.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दि. दि.16 मार्च, 2003 [संगणक अर्हता २ वर्ष अट] | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **सरळसेवा भरती मधील महत्वाच्या तरतुदी**<br>१.भरती वर्ष ज्या वर्षी भरतीची प्रक्रिया पार पडली आहे ते वर्ष .<br>२.सरळसेवेने आरक्षित पदावर पदासांठी पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही तर सदर पदाचे आरक्षण पुढील पाच भरती वर्षापर्यंत ओढणे आवश्यक आहे.<br>३.अनुसूचित जाती, अनूसुचित जमाती प्रवर्गाची पदे ही घटनात्मक असल्याने ती व्यपगत होत नाही.<br>४.एकाकी पदाला आरक्षण नाही.<br>५.आरक्षण कायद्यातील तरतुदीनुसार अनुसूचीत जाती व अनुसूचित जमातीसाठी उन्नत व प्रगत गटाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.<br>६.बिंदु नामावली ही प्रत्येक संवर्गासाठी सरळसेवा आणि पदोन्नतीसाठी स्वतंत्र ठेवणे आवश्यक आहे.<br>७.दि.५/६/२०२११ रोजीच्या शासन निर्णयानुसर तांत्रिक संवर्गातील उमेदवारांच्या मुलाखती घेणे बंद केले आहे. लेखी परीक्षेतील गुणावरुन अंतिम निवड यादी तयार केली जाते.<br>८.पदे भरती संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास अंतिम निर्णय अध्यक्ष जिल्हा निवड समिती यांचा असतो.<br>९.खुल्या प्रवर्गातील महिलांना ३० टक्के आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी क्रिमीलीयरचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.<br>१०.सरळसेवेची रिक्त पदे भरण्यापूर्वी संबधीत संवर्गाची बिंदु नामावली सहाय्यक आयुक्त (मा.व.क) यांच्याकडून तपासून घेणे आवश्यक आहे.<br>११.निवडसूची एक वर्षापर्यंत कार्यान्वित ठेवता येते. | |
| | | | | **नियुक्तीसाठी आवश्यक त्या अर्हता**.<br>१. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा प्रवेश ) नियम १९६७ मधील नियम ५ मधील परिशिष्ट ९ मधील ३,४,५,६,(वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, लघुलेखक, लघुटंकलेखक )<br>२.समान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.३/५/२००० नुसार सर्व पदांच्या सेवा प्रवेश नियमात संगणकाचे ज्ञानाची अर्हता बाबत उचित तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.<br>३.समान्य प्रशासन विभागाकडील अधिसूचना दि.२८/३/२००५ अन्वये वाढत्या लोखसंख्येला आलाळा घालण्याच्या दृष्टीने दोनपेक्षा अधिक मुले असणाऱ्यांना शासकीय सेवेसाठी अपात्र ठरविण्याची तरदुद निर्गमित करणेत आलेली आहे. तसेच दि.१/७/२००५ अन्वये जाहिरात देताना लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र विहित नमुन्यात प्राप्त करुन घेणेच्या सूचना आहेत. | |
| | | **प्रस्तावासोबत** | **लाभार्थी/ व्यक्तींची वैयक्तिक कागदपत्रे** | १.विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. शैक्षणिक अर्हता बाबतची कागदपत्रे.(दहावी प्रमाणपत्र,मराठी व इंग्रजी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, संगणक परीक्षा, उत्तीर्ण प्रमाणपत्र इ.)<br>३.खुला प्रवर्गातील महिलांसाठी क्रिमिलेअर प्रमाणपत्र.<br>४.प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्तासांठी जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र.<br>५.परीक्षा फी संबधीत चलने<br>६.जातीचा दाखला / जात वैधता प्रमाणपत्र.<br>७.रहिवासी दाखला.<br>८. लहान कुटूंबाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| PP३ | | **जोडावयाची कागदपत्रे उदा. विहित नमुन्यातील अर्ज, खरेदीचे बिल, आधार कार्ड आदी** | **कार्यालयीन कागदपत्रे** | १.मागासवर्ग कक्षाकडून पडताळणी केलेली आरक्षण बिंदुनामावली नोंदवही.<br>२.आरक्षण बिंदु नामावली नुसार मंजूर पदे, कार्यरत पदे, व रिक्त पदे,याबाबचा प्रवर्ग निहाय तपशील ,रिक्त पदे घेऊन सरळसेवा भरतीचे प्रमाणानुसार भरावयाच्या पदांची संख्या निशचीत करणे.<br>३.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश ) नियम ५ प्रमाणे अर्हता व इतर पात्रता.<br>४.रिक्त पदे भरणेस शासनाची मान्यता घेणेबाबतचे प्रारुप तयार करणे.<br>५.रिक्त पदे भरणेस मान्यता प्राप्त झालेनंतर जाहिरात प्रसिध्द करणे.<br>६.उमेदवारांकडून अर्ज मागवुन घेणे, त्याची छाननी करणे.<br>७.परिक्षेस पात्र उमेदवारांच्या संख्येनुसार परिक्षा घेणेबाबतची कार्यवाही करणे.<br>५.जिल्हा परिषदेची गट - क ची रिक्त पदे भरण्यासाठी प्रश्नपत्रिका काढण्याची जबाबदारी जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांची आहे. परीक्षा घेण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेने करावयाची आहे. | |
| PP४ | | प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम, कामाचे वार्षिक नियोजन, परीक्षा, मेळावे, कागदपत्र तपासणी कॅम्प , विशेष मोहिमा, प्रचार प्रसिध्दी | | लागू नाही. | |
| PP५ | | प्रक्रिया प्रस्तावित करताना जिल्हा परिषद विभाग/ पंस/ ग्रापं/ जि. प. कडील अन्य क्षेत्रीय कार्यालये तसेच शासनाच्या विभाग/ उपक्रम/ मंडळे / महामंडळे / मनपा/ नपा/ कटकमंडळे/ खाजगी संस्था यांचेकडून प्राप्त करावयाची माहिती, मान्यता, शिफारस | | १.रिक्त पदे भरणेससाठी ग्रामविकास विभागाची मान्यता आवश्यक. | |
| PP६ | | तपासणी अधिकारी स्तर पदनाम (Checker) (स.प्र.अ/क.प्र.अ/ पर्यवेक्षीय अधिकारी ) | | सहायय्क प्रशासन अधिकारी / कनिष्ठ प्रशासन अधिकारी | |
| PP७ | | प्रक्रिया मंजुरी देताना पडताळुन पहावयाच्या बाबी | | PP २ चे शासन निर्णयानुसार PP ३ मधील बाबी तपासणे. | |
| PA१ | | मान्यता अधिकारी स्तर पदनाम (खातेप्रमुख /इतर ) | | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| PA२ | प्रक्रिया मंजुरी (process approval ) | यादी/ आराखडा मान्यता अधिकार समितीस असल्यास, समिती नाव | शासनाने जिल्हा स्तरावर गट क ची पदे सरळसेवेनी भरणेसाठी खालीलप्रमाणे समिती गठित केलेली आहे.<br>अ.क्र. कार्यालयीन पद समितीवरील पद<br>१ जिल्हाधिकारी अध्यक्ष, जिल्हा निवड समिती<br>२ मुख्य कार्यकारी अधिकारी सदस्य<br>३ सेवायोजन अधिकारी सदस्य<br>४ महिला बाल कल्याण अधिकारी सदस्य<br>५ समाज कल्याण अधिकारी सदस्य<br>६ सैनिक कल्याण अधिकारी सदस्य<br>७ प्रकल्प अधिकारी, घोडेगाव ता.आंबेगाव सदस्य<br>८ ज्या विभागाची पदे भरावयाची आहेत त्या विभागाचा विभागप्रमुख सदस्य सचिव | |
| PA३ | | Endorsement (समर्थन ) अधिकारी स्तर पदनाम (मुकाअ /अति मुकाअ/ संबधित खातेप्रमुख) | मुख्य कार्यकारी अधिकारी | |
| PM१ | प्रक्रिया त्रुटीशोध (process Mapping ) | मंजुरी प्रक्रियेमध्ये सातत्याने आढळणाऱ्या त्रुटी | बिंदुनामावली नोंदवही अद्ययावत न ठेवलेने रिक्त पदांच्या तपशीलामध्ये तफावत आढळते. | |
| PI१ | प्रक्रिया सुधारणा (process improvization ) | अचुकता वेळेची बचत , मनुष्यबळ कार्यक्षम वापर , पारदर्शकता याकरिता माहिती तंत्रज्ञानाचा व संगणक आज्ञावली वापर करता येण्याजोग्या उपप्रक्रिया /बाबी | सरळसेवा भरती प्रक्रिया राबविणेसाठी संपूर्णपणे संगणक प्रणाली चा वापर होणे आवश्यक आहे. | |
| PI२ | | तांत्रिक (Technical) ज्ञान कमी पडत असल्यास प्रशिक्षण स्वरुप, अभ्यासक्रम | लागू नाही. | |
| PI३ | | मुळ संकल्पना, उद्देश , लेखा संहिता, प्राधिकरण यांचे अधिकार यास धक्का न लावता प्रक्रिया सुधारणे करिता शासन स्तरावर प्रस्तावित करायच्या बाबी | | |